पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ६

**सभावृत्तांत**

**दिनांक – २३/०८/२०१९** **वेळ - सकाळी ११.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **२३/०८/२०१९** रोजी सकाळी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.तुषार रघुनाथ हिंगे - सभापती**

२. मा.अभिषेक गोविंद बारणे

३. मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभूवन

४. मा.सागर बाळासाहेब गवळी

या शिवाय मा.बोदडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.श्रीम.गवळी – प्रशासन अधिकारी, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१३) जिजाऊ सांस्कृतिक व्यायामशाळा महिलांसाठी देणेबाबत – मा.सागर गवळी, मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१४) सभा आयोजनाबाबत – मा.सागर गवळी, मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

----------

अ) दिनांक २६/७/२०१९ व ९/८/२०१९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.४) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक ०९/०८/२०१९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिकाक्र.०५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – २१ विषय क्रमांक – ०१

दिनांक – २३/०८/२०१९ विभाग - क्रीडा

सुचक – मा.सागर गवळी अनुमोदक – मा.बाबासाहेब त्रिभूवन

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/६४४/२०१८, दि.३१/१२/२०१८

विषय – मे.सुमित स्पोर्टस ॲन्ड फिटनेस इक्विपमेंटस,चिंचवड,पुणे-१९ यांना भोसरी जलतरण तलाव, पाणी शुध्दीकरण,परिसर स्वच्छता,देखभाल व यांत्रिक दुरुस्ती कामकाज मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्र.१ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २२ विषय क्रमांक – ०२
दिनांक – २३/०८/२०१९ विभाग - क्रीडा
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सागर गवळी
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/११८/२०१९ दि.०६/०३/२०१९

विषय – प्रभाग क्र.१३ कै.बिंदू माधव ठाकरे व्यायामशाळा यमुनानगर ही क्रांतीवीर मित्र मंडळ यमुनानगर या संस्थेस ११ महिने कराराने चालविण्यास देणेबाबत.

विषय क्र.२ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २३ विषय क्रमांक – ०३
दिनांक – २३/०८/२०१९ विभाग - क्रीडा
सुचक – मा.बाबासाहेब त्रिभूवन अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/११५/२०१९ दि.०६/०३/२०१९

विषय – प्रभाग क्र.२६ पिंपळे निलख येथील कै.बाबूराव भांडे इमारतीमधील पिंपळे निलख व्यायामशाळा ही ओमसाई फाऊंडेशन विनायक नगर पिंपळे गुरव या संस्थेस ११ महिने कराराने चालविण्यास देणेबाबत..

विषय क्र.३ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २४ विषय क्रमांक – ०४
दिनांक – २३/०८/२०१९ विभाग - क्रीडा
सुचक – मा.सागर गवळी अनुमोदक – मा.बाबासाहेब त्रिभूवन
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४३४/२०१९ दि.०८/०८/२०१९

विषय - मनपाची प्रभाग क्र १७ येथील गुरूवर्य दादोजी कोंडदेव व्यायामशाळा ही शिवशक्ती महिला बचत गट चिंचवड सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास देणेबाबत.

विषय क्र.४ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २५ विषय क्रमांक – ०५
दिनांक – २३/०८/२०१९ विभाग - क्रीडा
सुचक – मा.बाबासाहेब त्रिभूवन अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४३०/२०१९ दि.०८/०८/२०१९

विषय - मनपाची राजमाता जिजाऊ व्यायामशाळा, काकडे पार्क चिंचवड ही काकडे पार्क मित्र मंडळ चिंचवड या संस्थेस सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास देणेबाबत.

विषय क्र.५ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २६ विषय क्रमांक – ०६

दिनांक – २३/०८/२०१९ विभाग - क्रीडा

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सागर गवळी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४२१/२०१९ दि.०८/०८/२०१९

विषय - प्रभाग क्र १५ सेक्टर क्र.२७ अ निगडी येथील स्वा.सावरकर व्यायामशाळा प्राधिकरणही कॅपस्टोन स्पोटर्स अँन्ड फिटनेस या संस्थेस सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास देणेबाबत.

विषय क्र.६ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २७ विषय क्रमांक – ०७

दिनांक – २३/०८/२०१९ विभाग - क्रीडा

सुचक – मा.सागर गवळी अनुमोदक – मा.बाबासाहेब त्रिभूवन

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४४४/२०१९ दि.०८/०८/२०१९

विषय - मनपाची सुदर्शननगर महिला हेल्थ क्लब चिंचवड ही व्यायामशाळा श्रीधरनगर युवा प्रतिष्ठाण या संस्थेस सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास देणेबाबत.

विषय क्र.७ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २८ विषय क्रमांक – ०८

दिनांक – २३/०८/२०१९ विभाग - क्रीडा

सुचक – मा.बाबासाहेब त्रिभूवन अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४४०/२०१९ दि.१४/०८/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.महापालिका सभा ठराव क्र.१२०६ दि.२०/१०/२०११ व मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/१८८/२०१२ दि.०४/०७/२०१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे, क्रीडा धोरणतील अट क्र.२३ मध्ये खेळाडू दत्तक योजने अंतर्गत निवड झालेल्या खेळाडूने सलग २ वर्षात राज्य, राष्ट्रीय व आंतरविद्यापीठ स्तरावर प्राविण्य न मिळविल्यास अशा खेळाडूंना तेथून पुढे या योजनेचा लाभ दिला जाणार नाही असे नमुद आहे. त्यानुसार खेळाडू दत्तक योजना २०१६-१७ चे लाभार्थी ४६ खेळाडूंच्या प्राविण्याबाबत संबंधीत क्रीडा पर्यवेक्षक व क्रीडा अधिकारी यांनी तपासणी केली असता २३ खेळाडू पात्र व ९ खेळाडू अपात्र तसेच उर्वरीत १४ खेळाडूंनी क्रीडा विभागात प्रमाणपत्रे सादर केलेली नाही. असा अहवाल क्रीडा विभागाला दिलेला आहे. २३ पात्र खेळाडूंना खेळाडू दत्तक योजना २०१९–२० चा लाभ १ वर्षाकरीता देणेस व त्याकामी येणा-या खर्चास र.रू.३२,४४,४००/-(अक्षरी र.रु.बत्तीस लाख चव्वेचाळीस हजार चारशे फक्त) चे खर्चास व सदरचा खर्च खेळाडू दत्तक योजना या लेखा शिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २९ विषय क्रमांक – ०९

दिनांक – २३/०८/२०१९ विभाग - क्रीडा

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सागर गवळी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४४८/२०१९ दि.१६/०८/२०१९

विषय - मनपाची किवळे येथील रामभाऊ भिमाजी तरस व्यायामशाळा ही श्री बापदेव महाराज स्वंयरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित या संस्थेस सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास देणेबाबत.

विषय क्र.९ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३० विषय क्रमांक – १०

दिनांक – २३/०८/२०१९ विभाग - क्रीडा

सुचक – मा.सागर गवळी अनुमोदक – मा.बाबासाहेब त्रिभूवन

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४५१/२०१९ दि.१६/०८/२०१९

विषय - मनपाचा प्रभाग क्र १५,सेक्टर २६ प्राधिकरण येथील छत्रपती शिवाजी महाराज व्यायामशाळा ही नवनाथ मित्र मंडळ आकुर्डी या संस्थेस सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास देणेबाबत.

विषय क्र.१० चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३१ विषय क्रमांक – ११

दिनांक – २३/०८/२०१९ विभाग - क्रीडा

सुचक – मा.बाबासाहेब त्रिभूवन अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४५२/२०१९ दि.१६/०८/२०१९

विषय - मनपाचा प्रभाग क्र १० मधील सदाशिव बहिरवडे क्रीडांगण शाहूनगर येथील व्यायामशाळा हनुमान स्पोर्टस अँकडमी चिखली या संस्थेस सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास देणेबाबत.

विषय क्र.११ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३२ विषय क्रमांक – १२

दिनांक – २३/०८/२०१९ विभाग - क्रीडा

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.बाबासाहेब त्रिभूवन

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४४६/२०१९ दि.१६/०८/२०१९

विषय - मनपाची सांगवी येथील सांगवी महिला व्यायामशाळा ही मनोहरी महिला बचत गट सांगवी या संस्थेस सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास देणेबाबत.

विषय क्र.१२ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ३३ विषय क्रमांक – १३
दिनांक – २३/०८/२०१९
सुचक – मा.सागर गवळी अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.सागर गवळी, मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.२० येथील जिजाऊ सांस्कृतिक भवन मधील व्यायामशाळा विशेष महिलांसाठी हनुमान जिम या संस्थेस सेवाशुल्क तत्वावर माफक दरात देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३४ विषय क्रमांक – १४
दिनांक – २३/०८/२०१९
सुचक – मा.सागर गवळी अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.सागर गवळी, मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा प्रत्येक महिन्याचे दुस-या व चौथ्या शुक्रवार सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात येत आहे. तथापि सदरची सभा प्रत्येक महिन्याचे दुस-या व चौथ्या शुक्रवार सकाळी ११.३० वा. ऐवजी दुपारी ३.०० वा. आयोजित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **तुषार रघुनाथ हिंगे** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३७३/२०१९
दिनांक : २३/०८/२०१९



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.